


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २८७ वा | गुरुवार दि. १६ जानेवारी २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# ठाकरेंनी एक पाऊल पुढे टाकलंय, पुढच्या संक्रांतीपर्यंत फडणवीसांच्या सोबत दिसतील, बड्या नेत्याचं भाकित

**वृत्तसंस्था/ अमरावती**

पुढच्या मकर संक्रांतीपर्यंत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दिसतील, असं भाकित भाजपचे सहयोगी युवा स्वाभिमान पक्षाचे आमदार रवी राणा यांनी वर्तवलं आहे. मकरसंक्रांतीच्या मुहूर्तावर रवी राणा, त्यांच्या पत्नी आणि भाजप नेत्या, अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी पतंग उडवण्याचा आनंद लुटला. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना ठाकरेंबाबत मोठं वक्तव्य केलं. एकीकडे, महाविकास आघाडीत वाढता तणाव, तर दुसरीकडे उद्धव ठाकरे असो वा आदित्य ठाकरे यांच्या देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत वाढत्या भेटीगाठी. यामुळे ठाकरे गट भाजपसोबत येण्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात उधाण आले आहे. अशातच रवी राणा यांनी भाकित करुन खळबळ उडवून दिली आहे. रवी राणा आणि नवनीत राणा यांनी मकर संक्रांती निमित्त एकत्र पतंग उडवण्याचा आनंद लुटला, यावेळी भाजपची पतंग वर जाणार की युवा स्वाभिमानी पक्षाची, असा मिश्कील सवाल राणांना विचारण्यात आला, त्यावर ते म्हणाले की आमची महायुती आहे, आम्ही भाजपसोबत उडू आणि अनेकांची पतंग कापू. नवनीत राणांची पतंग लोकसभेला चुकीच्या पद्धतीने कापणाऱ्यांची पतंग जनतेने विधानसभेला कापली, असा टोलाही त्यांनी प्रहार जनशक्तीचे नेते आणि माजी आमदार बच्चू कडू यांना लगावला. मकर संक्रांतीच्या निमित्ताने तीळगुळ घ्या आणि गोड गोड बोला, त्यांनी (बच्चू कडू) घरी बोलावलं तर नक्की जाऊ, असंही रवी राणा म्हणाले. लोकशाहीने दिलेला निर्णय बच्चू कडू यांनी स्वीकारला पाहिजे, पराभवानंतरही त्यांनी अमरावतीच्या विकासासाठी एकत्र यायला पाहिजे, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे सक्षम आहेत. अमरावती जिल्ह्याला पुढे नेण्यासाठी सर्वपक्षीय नेते-आमदारांनी एकत्र यावं, असं आवाहन रवी राणा यांनी केलं. दरम्यान, उद्धव ठाकरेंविषयी रवी राणा स्वतःहून म्हणाले, की राज्याच्या परिवर्तनात उद्धव ठाकरे यांनाही विनंती आहे, की तीळगुळ घ्या, गोड गोड बोला, देवेंद्र फडणवीस यांना भेटून ते एक पाऊल पुढे आलेले आहेत. पुढच्या मकर संक्रांतीपर्यंत उद्धव ठाकरे फडणवीसांसोबत दिसतील, असं भाकित रवी राणा यांनी व्यक्त केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं नेतृत्व खुल्या मनाने स्वीकारलं, तर हे नक्कीच घडेल, असा विश्वासही रवी राणा यांनी व्यक्त केला. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात युवा स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार हे महायुती म्हणून रिंगणात उतरतील. मग महापालिका निवडणुका असो किंवा जिल्हा परिषद, पंचायत समिती. पूर्ण ताकदीने पतंगासारखी भरारी घ्यायची आहे, असंही रवी राणा म्हणाले.



# रेवडी कारागीर गणपत भोईचा मृतदेह पिंपळगाव देवीच्या पुलाजवळ सापडला!

## गणपत भोईच्या मृत्यूची खळबळजनक माहिती!

**जनसंचलन/ पिंपळगाव**

पिंपळगाव देवी यात्रेमध्ये रेवडी बनवण्यासाठी आलेल्या गणपत भोई (रावेर) याचा दारूच्या नशेमुळे दुर्दैवी मृत्यू झाला. गणपत हा पिंपळगाव येथील एका स्थानिक व्यापाऱ्याकडे रेवडी बनवण्यासाठी आला होता. अत्यंत मद्यधुंद अवस्थेत असलेल्या गणपतचा मृतदेह लोणाळी जवळील पहिल्या पुलखाली काल दुपारी १.३० सुमारास आढळला. प्राथमिक तपासात पुलावरून खाली पडल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. घटनास्थळी धामणगाव बडेचे पोलीस निरीक्षक नागेश झाईले यांनी तत्काळ पोहोचून पंचनामा केला. या घटनेमुळे पिंपळगाव देवी यात्रेमध्ये खळबळ उडाली असून, स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते पोलीस तपास सुरू असून, मृत्यूमागील नेमकी कारणे शोधण्यासाठी पुढील प्रक्रिया सुरू आहे



# वीज क्षेत्रात चुकीला माफी नाही!

**जनसंचलन/बुलढाणा**

वीज यंत्रणेशी निगडीत काम करतांना नियमित कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कर्मचारी यांनी स्वत; सुरक्षेची पूर्ण खबरदारी घ्यावी आणि इतरांनाही खबरदारी घेण्यास बाध्य करावे.असे आवाहन अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके यांनी केले. बुलडाणा लघु प्रशिक्षण केंद्र येथे बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचाऱ्यांकरीता कामावरील सुरक्षिततेबात दक्षता या विषयावर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी कार्यकारी अभियंता मंगलसिंग चव्हाण,उपकार्यकारी अभियंता विनोद गुबे,व्यवस्थापक पोर्णिमा कदम ,यांच्यासह जिल्ह्यात विविध ठिकाणी बाह्यस्त्रोत तत्वावर कार्यरत असलेले ५६ तंत्रज्ञ आणि यंत्रज्ञचालक उपस्थित होते.यावेळी बोलतांना सुरेंद्र कटके म्हणाले की,अपघाताचे दुष्परिणाम संपूर्ण कुटूंबाला सोसावे लागतात.वीज क्षेत्रात चुकीला माफी नाही. त्यामुळे सुरक्षा साधनाशिवाय कोणीही विनाकारण आत्मविश्वास दाखवू नये,तथापि प्रत्येक कर्मचाऱ्यांनी कामावरील धोके ओळखत स्वत: खबरदारी घ्यावी आणि इतरांनाही खबरदारी घेण्यास प्रवृत्त करण्याचे आवाहन केले. या चर्चासत्रा दरम्यान ५६ बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे एचडीएफसी बँकेमार्फत झिरो बॅलन्स वेतन खाते उघडून देण्यात आलेत. तसेच लहुजी ठोंबरे बँकेचे प्रतिनिधी यांच्याकडून झिरो बॅलेन्स खाते व त्यात असलेल्य सुविधा,बँकेकडून मिळणारे विविध फायदे व अपघाती विमा रक्कम सुविधा याबाबतची माहिती देण्यात आली. महावितरण मध्ये काम करतांना सुरक्षा साधने व संभाव्य धोके याबाबत कशी काळजी घ्यावी याबाबत कार्यकारी अभियंता मंगलसिंग चव्हाण आणि उप कार्यकारी अभियंता विनोद गुबे यांनी आपले मार्गदर्शन केले.

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करणे हाच वाहतूक कोंडीवरील उपाय...

पुणे शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस जटील होत चालली आहे. शहरातील मध्यभाग, उपनगर, पेठांसह बस स्थानक, रेल्वे स्थानक परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी वाढली आहे. या ठिकाणांहून वाहन चालकांना मार्ग काढणे, आणि नागरिकांना चालणे देखील मुश्किल झाले आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीने दररोज पुणेकरांना जीव मुठीत धरावा लागत आहे. त्यामुळे पुणेकर अक्षरशः वैतागले असून पुण्यातील या वाहतूक कोंडीत पुणेकरांचा श्वास घुसमटत आहे. पुण्यातील वाहतूक कोंडीवर आता जगाने ही शिक्कामोर्तब केले आहे. टॉम टॉम या जागतिक संस्थेने जगातील ६२ देश आणि ५०० शहरांमधील रहदारीची माहिती संकलन करून ट्रॉफीक इंडेक्स २०२४ नावाचा अहवाल सादर केला. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरांची नावे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अहवालात जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या पाच शहरांमध्ये कोलाकोता, बेंगळुरू आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. या अहवालात सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात कोलकाता दुसऱ्या तर पुण्याचा चौथा क्रमांक लागत असल्याचे नमूद केले आहे. जगातील सर्वाधिक वाहतूक कोंडी असलेल्या शहरात पुण्याचा चौथा क्रमांक लागतो ही पुणेकरांसाठी भूषणावह बाब नसून चिंताजनक बाब आहे. पुण्यातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. दहा किलोमीटरच्या प्रवासासाठी पुणेकरांना ३३ मिनिटे २२ सेकंद लागतात. पुणेकरांचा सर्वाधिक वेळ हा प्रवासातच जातो. पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीला अनेक कारणे आहेत त्यातील सर्वात महत्वाचे कारण म्हणजे वाहनांची बेसुमार वाढती संख्या. एकेकाळी सायकलींचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात आज लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे दरवर्षी त्यात भरच पडत आहे. वाढत्या वाहनांमुळे रस्ते अपुरे पडत आहे. अरुंद रस्ते आणि त्यावर फोफावलेली अतिक्रमणे यामुळे पुण्यातील वाहतूक कोंडीत भरच पडत आहे. पुण्यातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी साधारणपणे एक हजार वाहतूक पोलीस रस्त्यावर असतात. पुणे शहराचा विस्तार मुंबईपेक्षा जास्त आहे. वाहतूक पोलिसांना उपलब्ध मनुष्यबळात काम करावे लागते. वाहतूक कोंडीला पोलिसांना दोषी ठरवले जाते. मात्र यात पोलिसांचा काहीही दोष नाही. पुण्यातील वाहतूक कोंडी रोखायची असेल




वाढत्या वाहनांना आळा घालवा लागेल आणि वाढत्या वाहनांना आळा घालायचा असेल तर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. जर पुण्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम झाली तर लोक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचाच वापर करतील त्यामुळे वाढत्या वाहनांना आळा बसेल आणि वाढत्या वाहनांना आळा बसला की वाहतूक कोंडीही कमी होईल आणि वाहतूक कोंडी कमी झाली की पुणेकरांना मोकळा श्वास घेता येईल.

लेखक
श्याम ठाणेदार


# म्हाडा कॉलनी मध्ये घरफोडी दागीने व रोख रक्कम पळविली....

जनसंचलन/बुलढाणा

म्हाडा कॉलनी मध्ये रात्रीच्या सुमारास घरी कोणी नसल्याने कुलूप तोडून घरफोडी केली.. घरातील दागीने व ३५ हजार रोख रक्कम चोरट्यांनी नरले चोरून.. एक आठवड्या पासून रेंटणे राहायला गेलेले संदीप वानखेडे हे रविवारी कुटुंबा सह मूळ गावी आंबेटाकली येथे गेले होते.. घर दोन दिवस बंद असल्याने अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास घराच कुलूप तोडून घरात प्रवेश केला व कपाट फोडून त्यातील ३५ हजार रोख व सोन्याचं मंगळसूत्र व सोन्याचं पेंडाल चोरट्यांनी चोरून नेले आज सकाळी संदीप वानखेडे



घरी आले असता घराचा दरवाजा उघडलेला दिसून आला व घरात जाऊन बघताच सर्व साहित्य अस्तव्यस्त पडलेले आढळून आले.. तात्काल पोलिसांना माहिती दिली व पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली व फिंगरप्रिंट एकसपर्ट ना बोलावून तपासनी केली.. चोरीची तक्रार् बुलढाणा पोलिसात दिली असून अज्ञात चोरट्याचा तपास पोलीस करीत आहे..




# वान विचारांचे , दान पूस्तकांचे...
## सुहासिनींनी दिले विधवांना धनधान्य व पुस्तकांचे वान !

जनसंचलन/ बुलढाणा

तीळ संक्रातीला महिला वाण देतात. विविध बियाणे,फळांच वाण देऊन एकमेकींना भेटतात. मात्र बुलढाण्यात पुस्तकांचे वान देऊन महिलांनी तीळ संक्रांत साजरी केली. वाण विचारांचे... दान पुस्तकांचे हे ब्रीद घेवून माणस फाउंडेशनने हा आगळा वेगळा उपक्रम राबविला. विशेष बाब म्हणजे विधवा महिलांना पुस्तके देऊन त्यांनाही या कार्यक्रमात सहभागी करण्यात आले. त्यामुळे आयोजित कार्यक्रम विशेष लक्षवेधी ठरला आहे. तीळ संक्रांत हा महिलांचा आवडीचा सण. या दिवशी महिला एकमेकींना वान देतात. शेकडो वर्षापासून ही परंपरा चालत आली आहे. तिळासोबत गुळाचा गोडवा ही चाखायला मिळतो. याच दिवशी एकमेकांशी गोड बोलण्याची हमी घेतली जाते. तिळगुळ घ्या गोड गोड बोला असे म्हणतात. मात्र मानस फाउंडेशन ने तिळगुळा सोबतच पुस्तकांचे वाण देऊन विधवा महिलांसोबतही गोड बोला हाच संदेश या कार्यक्रमातून दिला. शिवसाई ज्ञानपीठ तुलसी नगर बुलढाणा येथे दुपारी बारा वाजता कार्यक्रमाला सुरुवात झाली. मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डी एस लहाने व मानस फाउंडेशन चे सर्व कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित



झाले होते. कार्यक्रमासाठी विधवा व सवाष्ण महिला दोघांनाही निमंत्रित करण्यात आले. यावेळी सवास्त महिलांनी विधवांना कुंकू लावून पुस्तकांचे वाण दिले. अशा कार्यक्रमांमध्ये विधवा महिलांना दूर ठेवल्या जाते त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्या जाते. मात्र बुलढाणा येथे आयोजित कार्यक्रम हा विधवांना सन्मान देणारा ठरला. विधवा महिलांना पती सोडून गेल्यानंतर अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यातच समाजाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर त्यांच्या जीवनाची होरपळ होऊन जाते. त्यासुद्धा समाजाचा घटकच आहे हे स्मरणात ठेवून आपण त्यांना बंधू भावाची वागणूक दिली पाहिजे,असे मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डी एस लहाने यावेळी बोलतांना म्हणाले. तर प्राचार्य शहीनाताई पठाण,पत्रकार गणेश निकम , प्रतिभा भुतेकर अनीता कापरे, ज्योती पाटील, मनीषा वारे प्रज्ञा लांजेवार मीना लहाने अलका साबळे यांनी यावेळी विचार व्यक्त केले. संदीप जाधव, गौरव देशमुख व शिवशाही परिवारातील सदस्यांनी कार्यक्रमासाठी मेहनत घेतली. कार्यक्रमाला परिसरातून शेकडो महिलांची उपस्थिती लाभली होती. यामध्ये विधवा महिलांची संख्या लक्षणीय होती. स्त्री पुरुष तुलना हा ग्रंथ लिहून ताराबाई शिंदे यांनी महिला समतेची हाक दिली. १९ व्या शतकाच्या सुरुवातीला ताराबाईंनी स्त्री पुरुष तुलना हे पुस्तक लिहून खळबळ उडवून दिली दिली. पुरुषप्रधान व्यवस्थेला खड्या आवाजात प्रश्न करून ताराबाई शिंदेनी महिलांची कैफियत मांडली. ताराबाईंनी लिहिलेला हाच निबंध वाण म्हणून महिलांना देण्यात आला. ताराबाईंचे शेकडो पुस्तके आणून सवाष्ण महिलांनी विधवा महिलांना ही वैचारिक भेट दिली. त्यामुळे तीळ संक्रांतीचा हा कार्यक्रम वैचारिक पेरणी करून गेला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बुलढाणा तालुक्यातील अवसायनातील १०३ संस्थांची नोंदणी रद्द होणार

## आक्षेप नोंदविण्याचे सहायक निबंधकाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा तालुक्यातील १०३ सहकारी संस्थाची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सहायक निबंधक सहकारी संस्थाव्दारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ८९(४) नुसार अवसायनातील संस्थाशी ज्या कोण्या व्यक्ती वा संस्थेविरुद्ध काही दावे असल्यास त्यांनी जाहिर सूचना प्रसिद्ध झाल्यचे तारखेपासून दोन महिन्याचे आत नोंदवावे लागणार आहे. त्यानंतर दाव्यांची दखल घेतली जाणार नाही, असे सहकारी संस्थाचे सहायक निबंधक गजानन आमले यांनी कळविले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ नुसार सहकारी संस्था अंतिम अवसायनात घेण्यात अलेल्या अहेत. या संस्थावर अवसायकाची नियुक्ती यापुर्वीच करण्यात आलेली आहे. यापुढील दाखल केलेल्या दाव्याचे अनुषंगाने कोणत्याही दावा दाखल न झाल्यास त्यांनतर १०३ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी.

# अखिल भारतीय मराठा महासंघ क्रिडा विभाग तर्फे राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव निमित्त भव्य निबंध स्पर्धा व ग्रंथ प्रर्दशनी व दिनदर्शिका चे प्रकाशन संपन्न

**जनसंचलन/खामगाव**

स्थानिक अखिल भारतीय मराठा महासंघ क्रीडा शैक्षणिक व सांस्कृतिक विभाग खामगाव द्वारा आयोजित राष्ट्रमाता, राजमाता माँ जिजाऊ जन्मोत्सव निमित्त दिं १२ जानेवारी २०२५ रविवार रोजी सकाळी ११ वा श्री सदगुरू एकनाथ महाराज सार्वजनिक वाचनालय येथे जिजाऊ जन्मोत्सव व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली दुपारी ४ वा श्री छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम शिवाजी नगर खामगाव येथे भव्य निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले *निबंध स्पर्धा विषय राष्ट्रमाता जिजाऊ यांनी कसे घडविले शिवबा या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली* या मध्ये शेकडो विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभाग घेतला या प्रसंगी श्री सदगुरू एकनाथ महाराज सार्वजनिक वाचनालय च्या वतीने भव्य ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले तदनंतर अखिल भारतीय मराठा महासंघ क्रिडा विभाग च्या वतीने सन २०२५ च्या दिनदर्शिका ( कॅलेंडर ) चे प्रकाशन करण्यात आले



या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे वी मेहता हायस्कूल चे उपाध्यक्ष प्रभाकर राव बुराडे साहेब, प्रमुख उपस्थितीत माजी नगराध्यक्ष गणेश भाऊ माने, अखिल भारतीय मराठा महासंघ क्रिडा विभाग चे जिल्हा अध्यक्ष विकास चव्हाण, रमाकांत गलांडे, रामभाऊ बोन्द्रे, चंद्रकांत रेठेकर, सुभाष शेळके,सुनील पाटील, जयराज खेडकर,सुरेश घाडगे,श्याम आंबेकर,संजय नळकांडे, स्वप्नील शहा,राजु मुळीक, सुदाम पाडोळे,दिपक बागडे,आकाश खरपाडे,देविदास शर्मा, नागोराव अवतार, मुन्ना बोन्द्रे,शंतनू चव्हाण,विशाल भवर, गजानन मुळीक, आनंद पवार, आशिष पाचपोर,प्रतिक राठी, रूषिकेश नरवाडे, भरत रोटे, निखिल काळे, वैभव पवार, ग्रंथपाल सौ मिना मापारी,व परिसरातील महीला पुरूषांची उपस्थिती होती या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव सर सुकाळे यांनी केले अशी माहिती देविदास शर्मा यांनी दिली आहे

# जिजामाता महाविद्यालयात सशस्त्र सेना वयोवृद्ध दिन साजरा...

**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक जिजामाता महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने दि.१४ जानेवारी रोजी सशस्त्र सेना वयोवृत्त दिन साजरा करण्यात आला. सैन्यातील निवृत्त जवानांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी, देशाच्या रक्षणासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांचा सन्मान करणे, माजी सैनिकांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहणे या हेतूने दरवर्षी हा दिन साजरा करण्यात येतो. देशाच्या रक्षणासाठी सैनिक आपल्या प्राणांची आहुती देतात. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश एन. गवई,प्रा.लेफ्ट.पवन.र.ठाकरे यांनी उपस्थितांमध्ये निवृत्त माजी सैनिकांच्या देशसेवेचा, राष्ट्रसेवेचा गौरव केला. यावेळी उपस्थित निवृत्त जवानांमध्ये माजी सुभे. मेजर अजाबराव जाधव,हविलदार अनिल डोंगरदिवे,हवि. सिद्धार्थ मिसाळ, हवि. विजय राऊत, निवृत्त हवि. गुलाब मिसाळ व्यासपीठावर उपस्थित होते. एनसीसीच्या केडेट्सने त्रि-सेवेतील दिग्गजांच्या समर्पण आणि



त्याच्याबद्दल आपले मनोगत मांडले. यामध्ये जयूओ दर्शन चव्हाण, सार्जंट वैष्णवी निकाळजे, कॅडेट श्रद्धा राजगुरे, कॅडेट जान्हवी अहेर, कॅडेट वैभव सोनवणे, कॅडेट गौरी आढे यांनी देश सेवेसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांचा गौरव इतिहास एनसीसी कॅडेट्स समोर मांडला. यावेळी महाविद्यालयातील डॉ. सुबोध एन चिंचोले,प्रा. संजय साळवे, प्रा. डॉ.बी. एस. जाधव, डॉ.आनंद देशपांडे, प्रा. जी.एम. लोहाटे, डॉ. राजश्री येवले, डॉ. राहुल उके,एस.यू.ओ उमेश लेकुरवाळे माजी एनसीसी कॅडेट सचिन खांदेभराड व एनसीसी कॅडेट्स प्रामुख्याने उपस्थिती होती.

# लोकमंच बुलढाणा द्वारा अभिवादन सोहळा..

**जनसंचलन/बुलढाणा**

छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकशाहीवादी राजकारण केले. या पाठीमागे जिजाऊ साहेब यांची प्रेरणा होती. जिजाऊ सारखी माता पाठीशी असेल तर शिवबा सारखा नैतिक राजा तयार होतो, हा परिपाठ इतिहासाने दिला. जिजाऊंनी समतेचा विचार शिवबांच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरविला. जिजाऊ ह्या ज्ञानपीठ, विचारपीठ व संस्काराचा आदर्श असल्याचे प्रतिपादन लोकमंच कार्याध्यक्ष सुनील सपकाळ यांनी केले. लोकमंच बुलढाणा द्वारा राजमाता जिजाऊ मा साहेबांना चिंचोले हॉस्पिटल या ठिकाणी आज अभिवादन करण्यात आले. यावेळी सुनील सपकाळ बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी लोकमंच बुलढाणाचे अध्यक्ष डॉक्टर शोन चिंचोले होते. तर एडवोकेट जयसिंग राजे देशमुख, पत्रकार गणेश निकम, डॉ.पुरुषोत्तम देवकर ,अण्णासाहेब म्हळसने, सुनील जवंजाळ, सुरेश साबळे, गौरव देशमुख,प्राध्यापक ज्योती पाटील, बबन नाना, दामोदर बिडवे, डॉक्टर किनगे ,शैलेश खेडकर आदींची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांनी जिजाऊ पूजन केले. डॉक्टर शोणं चिंचोले यांनी भूमिका मांडली. बुलढाणा जिल्ह्याला जिजाऊ मुळेच ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाल्याचे डॉक्टर शोंन चिंचोले म्हणाले. एडवोकेट जयसिंग राजे, दामोदर बिडवे, डॉक्टर देवकर यांनीही प्रसंगी जिजाऊ यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. संचलन व आभार पत्रकार गणेश निकम यांनी केले.

# प्रा. देवबा पाटील यांच्या मनोरंजनातून विज्ञान बालकथा संग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार.

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव येथील गो. से.महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक देवबा शिवाजी पाटील यांच्या मनोरंजनातून विज्ञान ह्या विज्ञानाधारित बालकथासंग्रहास माँ जिजाऊ सार्वजनिक वाचनालय व व्हाड विकास बहुउद्देशिय संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा ह्या वर्षीचा उत्कृष्ट बालवाङ्मयाचा राज्यस्तरीय जिजाऊ वाङ्मय पुरस्कार हा संपूर्ण महाराष्ट्रात साहित्य क्षेत्रात सन्मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार प्राप्त झाला आहे. हा विज्ञान बालकथासंग्रह रजत प्रकाशन, छ.संभाजीनगर यांनी प्रकाशित केला आहे. प्रा. देवबा पाटलांचे आतापर्यंत बालसाहित्याचे ३२ व इतर बहुविध प्रकारच्या साहित्याचे २९ अशी एकूण ६१ पुस्तके प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या अनेक पुस्तकांना विविध वाङ्मयीन पुरस्कार मिळालेले आहेत तसेच त्यांच्या वाङ्मयातील विशेष योगदानाबद्दलसुद्धा त्यांना बहुविध सन्मानांनी गौरविण्यात आलेले आहे. आतापर्यंत त्यांना एकूण ३१ पुरस्कार व मान सन्मान प्राप्त झालेले आहेत. विशेष म्हणजे म.रा. पाठ्यपुस्तक मंडळाने त्यांच्या गंमत जंमत बालकाव्यसंग्रहातील खार ही कविता अमराठी शाळांच्या वर्ग २ च्या मजेत शिकूया मराठी या पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेली आहे. तसेच भारत सरकारच्या सर्वोच्च अशा साहित्य अकादमीच्या मराठी भाषेच्या बालसाहित्य पुरस्कार सल्लागार समितीवर सुद्धा त्यांनी कार्य केलेले आहे. ह्या वाङ्मय पुरस्कार वितरणाचा समारंभ राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्त राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यात दि.१२ जानेवारी २०२५ रोजी सत्कार समारंभात मान्यवरांचे हस्ते अकोला येथे राजमाता जिजाऊ वाचनालयामध्ये संपन्न झाला. ह्या पुरस्काराचे सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रासह वितरण मा. जी जी वाहूर वाघ साहेब, अध्यक्ष, अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था अकोला यांच्या अध्यक्षतेखाली, मा. पंजाबराव वर, अध्यक्ष, मां जिजाऊ वाचनालय अकोला यांच्या शुभहस्ते आणि सुप्रसिद्ध साहित्यिक मा. पुष्पराज गावंडे, अकोला व मा. संजय देशमुख, अध्यक्ष, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ अकोला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले

# बुलढाणा येथे गुरुवार १६ जाने रोजी डिजिटल मिडिया परिषदेची जिल्हास्तरीय बैठक



जनसंचलन/बुलढाणा

मराठी पत्रकार परिषद संलग्नित डिजिटल मीडिया परिषदेची जिल्ह-स्तरीय बैठक पत्रकार भवन बुलढाणा येथे उद्या, गुरुवार, १६ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हा पत्रकार भवन याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. बदलत्या काळानुसार प्रिंट मिडियासोबतच डिजिटल मिडियाचे महत्त्व आहे.याची दखल घेत मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सरांचे मार्गदर्शनात डिजिटल मिडिया परिषदेची शाखा सुरू करण्यात आली. डिजिटल मिडिया परिषदेचे पहिले राज्य अध्यक्ष होण्याचा मान अनिल वाघमारे बीड यांना मिळाला. त्याअनुषंगाने राज्यभर डिजिटल मिडिया परिषदेचे संघटन वेगाने उभे करण्याचे काम त्यांनी हाती घेतले असून प्रारंभी बीड जिल्ह्यासह सांगली,सातारा, पुणे,परभणी,कोल्हापूर व आता बुलढाणा जिल्हास्तरीय कार्यकारिणीची निवड करणार आ-हेत.डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या बैठकीस जिल्ह्यातील संघटनेचा आढावा घेण्यात येईल तसेच मराठी पत्रकार परिषदेचे नवनियुक्त राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे,बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंह राजपूत व जिल्हा पदाधिकारी यांचा बैठकीत प्रदेशाध्यक्ष अनिलजी वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. बैठकीत डिजिटल मीडिया परिषदेची जिल्हा कार्यकारिणीचे नव्याने गठन करण्यात येणार आहे.बैठकीत घाटाखाली व घाटावर असे दोन विभाग करून दोन जिल्हाध्यक्षांची नियुक्ती करण्यात येईल तरी जिल्हा-तील यूट्यूब, पोर्टल व न्यूज चॅनलच्या संपादक व पत्रकारांनी बैठकीस उपस्थित राहावे असे आ-वाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हा प्रभारी तथा राज्य उपाध्यक्ष अनिल उंबरकर यांनी केले आहे.

# वळतीत दोन गटात राडा!

## आरोपींवर गुन्हे दाखल!



जनसंचलन/ चिखली

चिखली शहराजवळील वळती येथे १४ जानेवारी रोजी वैयक्तिक भांडणातून दोन गटांमध्ये बाचाबाची होऊन हाणामारी झाली होती.या प्रकरणी पोलिसांनी अवघ्या काही मिनिटातच घटनास्थळ गाठून परिस्थिती नियंत्रणात आणल्यामुळे मोठा जातीय धार्मिक तणाव होण्यापूर्वीच निवळला.दरम्यान ८ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या घटनेतील आरोपींना पोलिसांनी अटक केली असून आज त्यांना चिखली न्यायालयामध्ये उपस्थित केले जाणार आहे. या संदर्भात थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी प्रशांत धनवे हा काल रात्री ८ वाजता त्याचे दूध संकलन केंद्रावर हजर असताना तेथे साक्षीदार गोपाल धनवे हा दूध घेऊन आला व दूध देऊन परत मोटार सायकल घेऊन घरी जात होता. त्या वेळी नादर खा गुलशर खा (५०) हा तेथे आला व गोपाल धनवे यास तू माझे तोंडावर मोटरसायकलचा लाईट का मारला असे म्हणून चापटा बुक्क्यांनी मारहाण केली. प्रशांत धनव-े यांनी नादरखा याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता त्याला सुद्धा शिवीगाळ करून चापट मारली. त्यानंतर नादरखा याने अलतमश खा साबेर खा रा-हील रइस पटेल, सिराज मस्तान पटेल, इम्रान मस्तान पटेल, शोराब मस्तान पटेल, आसिफ आजीम पटेल, आजीम हनीफ पटेल यांना बोलावून घेतले. या सर्वांनी प्रशांत धनवे व साक्षीदार यांना लाथा बुक्क्यांनी व लोखंडी फायटर मारहाण करून जखमी केले व जीवे मारण्याची धमक्या दिल्या. फिर्यादी प्रशांत धनवे यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून चिखली पोस्टेला २०२५ कलम ११८ (१) ११५ (२) १८९ (२)१९१(२) १९१ (३) १९०, १३५ (२) ३५१(३)३५२ या भारतीय दंड संहितेच्या कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आर-ोपींना चिखली पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ठाणेदार संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक शरद भागवतकर पुढील तपास करत आहेत.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४



पत्रकारीतेचा धर्म आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

काही तक्रार असल्यास संपर्क

शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040 पिन 443001



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958